दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष–२ ■ अंक–५० ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १० जुलै २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# 221 कोटींच्या पाणी योजनेचे उदघाटन होऊनही दिव्यातील जनतेला पुरेसे पाणी नाही...

## आता जाब विचारावाच लागेल!

ज्या इमारती/चाळी पाणी बिल भरत असतानाही त्यांना पाणी मिळत नाही त्यांनी संपर्क साधावा!

ज्या इमारती अधिकृत नळ कनेक्शन मागत आहेत, मात्र त्यांना ते दिले जात नाही अशा नागरिकांनी देखील संपर्क साधावा!



9221604204

-सौ.ज्योती राजकांत पाटील
महिला मंडळ अध्यक्षा,दिवा भाजपा

# दिवा भाजप,जनतेसोबत!



## घराच्या पत्र्यामध्ये आढळला अजगर

**ठाणे:** वागळे इस्टेट, श्रीनगर परिसरातील वारली पाडा हा तसा डोंगराजवळील भाग तेथे लक्ष्मण इंगोले यांचे घर आहे. त्या घराच्या पत्र्यामध्ये सोमवारी रात्री अजगर जातीचा सर्प निर्दशनास आला. या माहिती तातडीने स्थानिक नागरिकांनी मुलुंड येथील आरएडब्ल्यूडब्ल्यू या सामाजिक संस्थेला दिली. त्या संस्थेचे सदस्य तथा प्राणी मित्र असलेले रवींद्र सूर्यवंशी यांना त्या अजगराला पकडले. हा अजगर १५ ते २० दिवसांचा असून त्यांची लांबी १ फूट तर वजन अंदाजे १०० ते १५० ग्रॅम इतके असावे. याबाबत वनविभागाला माहिती दिली. तसेच त्यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्या अजगराच्या पिल्लाला पुन्हा निर्सगाच्या सानिध्यात मुक्तसंचारासाठी मंगळवारी सोडण्यात आल्याची माहिती प्राणी मित्र सूर्यवंशी यांनी बोलताना दिली.



## धावत्या गाडीवर पडला झाड

ठाणे: कल्याणकडून वाशीकडे जात असताना बेचन मल्हार यांच्या मालकीच्या धावत्या चारचाकी गाडीवर झाड पडल्याची घटना कल्याण फाटा रोडवरती गुरुवारी दुपारी पावणे सहा वाजण्याच्या सुमारास घडली. यावेळी त्या गाडीत चौघे जण होते. ते थोडक्यात बजावले असून सुदैवाने त्यापैकी कोणालाही दुखापत झाली नाही. पण झाड पडल्याने गाडीचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस आणि ठामपाच्या शीळ अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली होती. त्या जवानांनी पडलेले झाड कापून बाजूला केले. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## मानपाड्यात चाळीच्या गॅलरीचा काही भाग पडला

### ४० वर्षे जुने बांधकाम



**ठाणे:** चितळसर -मानपाडा येथील तळ अधिक एक मजली अष्टविनायक चाळीतील राजेंद्र चुडावत याच्या घराच्या गॅलरीचा काही भाग पडल्याची घटना गुरुवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. हा भाग कोसळला त्यावेळी त्या खाली सुदैवाने कोणी नसल्याने कोणालाही दुखापत झालेली नाही. तर ठामपा आपत्ती व्यवस्थापन विभागाने घटनास्थळी धोकापट्टी बांधून चाळीतील सात रहिवाशांना तात्पुरत्या स्वरुपात शेजारच्या चाळीत स्थलांतरीत केले. तरचाळीच्या बाजुच्या रस्त्यावर पडलेला गॅलरीचा भाग बाजूला करत तो रस्ता रहदारीकरिता मोकळा करण्यात आला आहे. गॅलरीचा भाग कोसळला ते बांधकाम ३५ ते ४० वर्षे जुने असून तेथे घराचे मालक चुडावत यांचे तळाला दोन आणि पहिल्या मजल्यावर एक असे तीन रूम आहेत. ते तिन्ही रूम त्यांनी भाड्याने दिलेले असून तेथे भाडेकरू वास्तव्यास आहेत. तर घराच्या अंदाजे १० ते १२ फूट गॅलरीचा काही भाग पडला असून उर्वरित भाग धोकादायक स्थितीत आहे.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## ठाण्यात एसटी बसचा अपघात; बसवाहकासह प्रवासी महिला जखमी

**ठाणे:** ठाण्यातून बोरिवलीला निघालेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एसटी) बसचा ठाण्यातील पूर्व द्रुतगती महामार्गावर शनिवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास अपघात झाला. अपघातग्रस्त बस पाहून बसचालक हा भरधाव वेगाने बस घेऊन जाताना, बसच्या पुढे असलेल्या कंटेनरला त्याने मागून जोरदार धडक दिल्याचे प्राथमिक दर्शनी दिसत आहे. वाहक बसलेल्या बसचा दर्शनीभागाचे मोठ्या प्रमाणात झाले. यावेळी बसमध्ये ९ प्रवासी होते, त्यामधील बस वाहक अमर परब (३८) आणि प्रवासी महिला गीता कदम (४१) हे दोघे जखमी झाले आहेत. त्यांच्या ठामपाच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तसेच त्या दोघांच्या दोन्ही पायाला दुखापत झालेली आहे. तसेच इतर प्रवासी सुखरूप असल्याने ते घटनास्थळावरून आपापल्या घरी मार्गस्थ झाले आहेत.

एसटी बस चालक संदीप पाटील (३७) आणि जखमी वाहक अमर परब हे दोघे ठाण्यातून १४ ४४८९ या क्रमांकाची एसटी बस घेऊन बोरीवलीला निघाले होते. यावेळी बसमध्ये चार महिला आणि पाच पुरुष असे ९ प्रवासी बसलेले होते. बस पूर्व द्रुतगती महामार्गावर आल्याने चालक पाटील यांनी वेग वाढला असल्याने ज्युपिटर हॉस्पिटल समोर आल्यावर बसने पुढे असलेल्या कंटेनरला वाहक बसत असलेल्या साईटने मागून धडक दिली. ही धडक इतकी जोरात होती. वाहकाच्या बाजूची साईटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शिवाय बसचे वाहक परब आणि डोंबिवली कोपर,आयरे गाव येथील प्रवासी महिला कदम असे दोघे त्या अपघात जखमी झाले आहेत. त्या दोघांच्या दोन्ही पायाला दुखापत झालेली आहे. अपघातानंतर कंटेनर चालक पसार झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी कापूरबावडी पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी धाव घेतली होती. सकाळी झालेल्या या अपघाताने त्या परिणाम वाहतुकीवर झाला होता. तसेच अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या एका बाजूला करण्यात आली त्यानंतर तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला. याप्रकरणी पुढील तपास चितळसर मानपाडा पोलीस करत आहेत.

### इतर प्रवासी सुखरुप



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिव्यात ठाकरेंच्या शिवसेनेचा सामाजिक उपक्रमांवर भर, भव्य रक्तदान शिबिर संपन्न



## कोकणातील आमदार राजन साळवी यांची प्रमुख उपस्थिती





दिवा:- ठाकरेंच्या शिवसेनेने दिवा शहरात पक्ष बांधणीस सुरुवात केली असून विविध समाज उपयोगी उपक्रम राबवून जनतेमध्ये जाण्याचा प्रयत्न शिवसेनेच्या माध्यमातून केला जात आहे. रोटरी क्लब दिवा व ठाकरेंच्या शिवसेनेमार्फत दिवा शहरात नुकतेच भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला ठाकरेंच्या शिवसेनेचे उपनेते, कोकणातील आमदार राजन साळवी उपस्थित होते.

या शिबिराला शिवसैनिक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.शिवसेना दिवा शाखेच्या वतीने कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख माजी आमदार सुभाष भोईर यांच्या जनसंपर्क कार्यालयात सदर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात स्थानिक शिवसैनिक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. याप्रसंगी कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख सुभाष भोईर, जिल्हाप्रमुख सदानंद थरवल, माजी नगरसेविका अंकिता पाटील,उपशहर प्रमुख सचिन पाटील, प्रियांका सावंत, योगिता नाईक, गुरु नाईक, मच्छिंद्रनाथ लाड,अभिषेक ठाकूर,अक्षय म्हात्रे,स्मिता जाधव यासह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दिवा मनसेचे टोरंट कंपनीला विविध समस्यांबाबत निवेदन

**दिवा:-** दिवा शहरातील वीज विषयक समस्या बाबत मनसेने नुकतेच टोरंट अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले. दिवा शहरात जवळपास ३ लाख लोकसंख्या असताना एनपीसी कार्यालय नाही. नागरिकांची गरज टाळण्यासाठी याबाबत उपाययोजना करण्याची मागणी मनसेने निवेदना मार्फत केली.

लाईट गेली असता तक्रार केल्यानंतर टोरंट विभाग कडून कोणतीही शहानिशा न करता अपेक्षित उत्तर दिले जात नाही असा आरोप मनसेने केला आहे. भिवंडीचे चेतन बद्यांनीना मनसेने संपर्क केला असता त्यांच्या कडून मिळालेल्या माहीत नुसार दिवा शहराची लाईट दुरूस्ती साठी टीम मुंब्रा येथून येते. त्यानुसार दिवा शहर अध्यक्ष तुषार भास्कर पाटील यांच्या सूचनेनुसार दिवा टोरंट कार्यालयाला मनसे कडून पत्र देण्यात आले.

यावेळी टोरेंटचे भिवंडीचे अधिकारी अक्रम उपस्थित होते. या समस्येवर त्वरित तोडगा काढू असे आश्वासन टोरंट अधिकाऱ्यांनी मनसेला दिले..

यावेळी दिवा मनविसेचे विभाग अध्यक्ष कुशाल पाटील,दिवा मनसेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील, मनविसे चे उपविभाग अध्यक्ष सोनिश माधव,संदीप घाग, ज्ञानेश्वर आगवने,रमेश पाटील उपस्थित होते.

## दिव्यात बस प्रवासी निवारा नसल्याने नागरिकांकडून पालिकेच्या भूमिकेवर नाराजी

**दिवा:-**दिवा शहरातून ठाणे व नवी मुंबई परिवहनच्या बसेस सुरू झाल्या खऱ्या मात्र येथे मध्यवर्ती बस थांबा किंवा प्रवासी निवारा नसल्याने बस प्रवाशांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

मध्यवर्ती बस थांबा किंवा प्रवासी निवारा नसल्याने दिव्यातून ठाणे आणि नवी मुंबईकडे कामानिमित्त प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे भर पावसात हाल होत आहेत.मनसेचे आमदार राजू पाटील यांनी येथील प्रवाशांसाठी तात्पुरता प्रवासी निवारा बांधून दिला होता मात्र तो महापालिका प्रशासनाने हटविला. महापालिका प्रशासनाने त्यानंतर स्वतः हून प्रवासी निवारा अद्याप न बांधल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.



## बदली होऊन आलेल्या २४ पोलीस निरीक्षकांपैकी तिघांच्या खांद्यावर पोलीस ठाण्याची जबाबदारी

**ठाणे:** राज्यातील इतर पोलीस दलातून बदली होऊन ठाणे पोलीस दलात आलेल्या तब्बल २४ पोलीस निरिक्षक यांची आयुक्तालयातील विविध आस्थापनात नियुक्ती करण्यात आली. यामध्ये नवीमुंबई आणि ठाणे ग्रामीण पोलीस दलातून आलेल्या त्या तिघा अधिकाऱ्यांच्या खांद्यावर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदीची जबाबदारी देण्यात आली आहे. याशिवाय त्या २४ जणांमध्ये यंदा चार महिला पोलीस निरीक्षक ठाण्याला लाभल्या आहेत. त्या चौघींमधील स्मिता भरत जाधव या पोलीस अधिकारी महिलेची नुकतेच सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे म्हणून घोषित झालेल्या राबोडी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी (ठाणेदार) वर्णी लागलेली आहे. याचबरोबर इतर पोलीस निरीक्षकांना गुन्हे-विशेष- -आर्थिक गुन्हे, नियंत्रण कक्ष, पोलीस ठाणे आदी आस्थपना या ठिकाणी नेमणूक झाली आहे.

शहर पोलीस दलाचे सह पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे यांनी ही नेमणूक झाल्याचे परिपत्रक ४ जुलै रोजी काढले आहे. यामध्ये नंदुरबार येथून आलेले पोलीस निरीक्षक राजेश शिरसाठ यांना विशेष शाखा मिळाली आहे. नवीमुंबईतून ठाण्यात आलेले सुनील पाटील यांची नियंत्रण कक्षेत, स्मिता जाधव यांची राबोडी तर नितीन गीते यांची डोंबिवली पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदी तसेच निशिकांत विश्वकार यांची भिवंडी पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक पदी नेमणूक झाली आहे. तर भारत कामत यांची विशेष शाखा, राजू सोनावणे यांची आर्थिक गुन्हे शाखा,अर्जुन गरड यांची गुन्हे शाखा, विजय कादवाने आणि संदीपान शिंदे या दोघांची अतिक्रमण विभागात, विजय वाघमारे यांनी राबोडी पोलीस ठाण्यात नेमणूक केली आहे. ठाणे ग्रामीण अधीक्षक कार्यालयातून बदलीवर आलेले दत्तात्रय बोराटे यांची टिळकनगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदाचे दावेदार ठरले आहेत.

# ठाणे रेल्वे स्थानकात पादचारी पुलावरील होणारी गर्दी टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना करा

## खासदार राजन विचारे यांची रेल्वे प्रशासनाकडे मागणी



**ठाणे: ऐतिहासिक असलेल्या ठाणे रेल्वे स्थानकातील प्रवाशांचा वाढणारा भार ठाणे रेल्वे स्थानक पेलू शकत नसल्याने मंजूर झालेले प्रकल्प तात्काळ सुरू करा. तसेच या स्थानकात यापूर्वी एकूण सात पादचारी पुलांपैकी दोन पादचारी पुल नव्याने बांधण्याकरिता तोडण्यात आलेले आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत या स्थानकात प्रवाशांना ये - जा करण्यासाठी फक्त पाच पादचारी पूल असून त्यावर प्रवाशांचा भार पडत आहे. यासाठी तात्काळ उपयोजना करण्यासाठी कल्याण दिशेस असलेला पादचारी पुल सॅटिसला जोडण्यात यावा अशी मागणी खासदार राजन विचारे यांनी मुख्य व्यवस्थापक नरेश लालवाणी व मुख्य रेल्वे प्रबंधक रजनीश गोयल यांच्याकडे पत्राद्वारे पुन्हा केली आहे. तसेच स्थानकातील पादचारी पुलावरील गर्दीचे फोटो पाठविले आहेत.**

ठाणे रेल्वे स्थानकात ठाणे महापालिकेने मंजूर केलेल्या २४ कोटी निधीतून पादचारी पुलाचे काम रेल्वे मार्फत सुरू आहे. त्यापैकी महापालिकेने ८ कोटी निधी रेल्वे प्रशासनाकडे वर्ग केला आहे. व पुढील निधी प्राप्त होण्यासाठी ठाणे महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. परंतु निधीअभावी काम थांबवू नका या पुलावरून रेल्वे प्रवासी ये-जा करणार आहेत. त्यामुळे जबाबदारी ढकलू नका. या पुलावर गर्डरचे काम तात्काळ सुरू करा अशी मागणी रेल्वे प्रशासनाकडे खासदार विचारे यांनी दिलेल्या निवेदनात केली आहे. तसेच दिवसेंदिवस ठाणे रेल्वे स्थानकातील गर्दी वाढत असल्याने पश्चिम रेल्वे मार्गावरील एलफिस्टन रोड स्थानकातील घटनेची पुनरावृत्ती ठाणे रेल्वे स्थानकात होऊ नये याची रेल्वे प्रशासनाने दखल घ्यावी व तात्काळ उपायोजना करावी असे म्हटले आहे. रेल्वे प्रशासनानेही याची दखल घेऊन काम सुरू करू असे आश्वासन खासदार विचारे यांना दिले आहे.

# गांधीनगर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाला वेग येणार

## सभासदांची सभा जुलैत, तर यादी १५ ऑगस्टपर्यंत



**ठाणे: काही वर्षांपासून रखडलेल्या पोखरण रोड क्र. दोनवरील गांधीनगर झोपडपट्टी प्रकल्पाचे काम वेगाने होण्यासाठी भाजपाचे आमदार व जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे यांनी पुढाकार घेतला आहे. या प्रश्नासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांबरोबर घेतलेल्या बैठकीनंतर सर्व गृहनिर्माण संस्थांची सर्वसाधारण सभा जुलैत, तर संस्थानिहाय सभासदांची यादी १५ ऑगस्टपर्यंत अंतिम करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

काही दिवसांपूर्वी ऐन पावसात रहिवाशांची घरे पाडण्यात आली होती. रखडलेला विकास मार्गी लावण्याबरोबरच जुने पात्र झोपडीधारक व नवीन पात्र झोपडीधारक यांची यादी जाहीर करावी, पात्र झोपडीधारकांच्या सोसायटीची निवडणूक जाहीर करावी, या योजनेतील चार सोसायट्या व लगतच्या जय भवानी सोसायटी यांच्या यादीत काही नावे दोन वेळा आली असल्यामुळे यादीची छाननी करावी, सोसायटीच्या समितीची निवडप्रक्रिया होईपर्यंत विकासकाला काम थांबविण्याचा आदेश द्यावा, सोसायटीतील सभासदांच्या तोडलेल्या घरांचा ढिगारा उचलून विजेचे मीटर काढून टाकावेत आदी मागण्या करण्यासाठी प्राधिकरणाच्या कार्यालयात नुकतीच बैठक झाली. या बैठकीला आमदार डावखरे यांच्याबरोबरच भाजपाचे माजी नगरसेवक मुकेश मोकाशी, भाजपा पोखरण मंडल चे अध्यक्ष संतोष जायसवाल, रमेश आंब्रे, उपमुख्य अभियंता नितीन पवार, उपजिल्हाधिकारी वैशाली परदेशी, कार्यकारी अभियंता राजकुमार पवार, सहायक निबंधक चेतन चौधरी आदींसह विकासकाचीही उपस्थिती होती.

# ठामपाच्या मोफत फिरत्या दवाखान्यामार्फत मिळणार आता प्राथमिक उपचार

**ठाणे :** ठाणे महानगर पालिकेच्यावतीने नागरिकांच्या सोईसाठी मोफत फिरता दवाखाना सुरू करण्यात आला असून या दवाखान्याचे उद्घाटन बुधवारी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त उमेश बिरारी तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.






ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी दररोज सकाळी ८.३० ते ४.३० या वेळेत हा मोफत दवाखाना उपलब्ध असणार आहे. या फिरत्या दवाखान्यामध्ये डॉक्टर्स, नर्स रक्ताच्या प्राथमिक चाचणया, औषधे असणार आहेत. या दवाखान्याला स्क्रीन लावण्यात आली असून या स्क्रीनच्या माध्यमातून आरोग्यविषयक घ्यावयाची काळजी आदींबाबतच्या सूचना दिल्या जाणार आहे. या फिरत्या दवाखान्यामुळे रुग्णांना प्राथमिक उपचार उपलब्ध होणार आहेत. आजपासून हा फिरता दवाखाना शहरातील झोपडपट्टी परिसरात फिरणार असल्यामुळे गोरगरीब नागरिकांना याचा निश्चितच फायदा होणार आहे. पॅनॉसॉनिक इंडिया आणि गुरूकृपा फाऊंडेशन यांचे देखील सहकार्य या फिरत्या दवाखान्यास लाभले आहे.

# ठामपा सार्वजनिक शौचालयाच्या छताचे प्लास्टर पडून दोघे जखमी

**ठाणे:** ठाणे महानगरपालिकेच्या तळ अधिक दोन मजली असलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या दुसरा मजलावरती राहण्यासाठी बांधण्यात आलेल्या रुमच्या छताचे प्लास्टर पडून दोन मुली जखमी झाल्या आहेत. ही घटना बुधवारी सकाळी पावणे दहा ते दहा वाजण्याच्या सुमारास खोपट,प्रताप टॉकीज जवळ, ब्रम्हांड सेवा संघाच्या बाजूला घडली. हे शौचालय दहा वर्षे जुने आहे. गौरी संतोष गायकवाड या १३ वर्षीय मुलीच्या डोक्याला शिखा सुनिल कारतीया या १७ वर्षीय मुलीच्या उजव्या पायाला किरकोळ दुखापत झाली आहे. अशाप्रकारे आठवड्यातील दुसरी घटना आहे.

या घटनेची माहिती माजी नगरसेविका नंदा पाटील यांनी दिली होती. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी,उथळसर प्रभाग समिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप-अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी धाव घेतली होती. तसेच घटनास्थळी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आपत्ती व्यवस्थापन कक्षा मार्फत धोकापट्टी बांधण्यात आली आहे.अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली. ठामपाचे तळ अधिक दोन मजली सार्वजनिक शौचालयाच्या छताचे प्लास्टर कोसळल्याची घटना रविवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास उथळसर,आझाद नगर, गोकुळ नगर, या ठिकाणी घडली होती.



# रस्त्यात बंद पडलेल्या रुग्णवाहिकेतील रुग्णाला मुख्यमंत्री शिंदेंनी केली मदत

**ठाणे:** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा संवेदनशीलपणाचा प्रत्यय पुन्हा एकदा पहायला मिळाला. गडचिरोली येथील आपला नियोजित दौरा आटोपून ठाण्याकडे परतत असताना मुख्यमंत्र्यांना अचानक एक रुग्णवाहिका बंद अवस्थेत उभी असलेली दिसली. चुनाभट्टी कुर्ला येथील पुलावर ही रुग्णवाहिका बंद पडलेली पाहून मुख्यमंत्र्यांनी तातडीने त्यांच्या गाड्यांचा ताफा थांबवून या रुग्णवाहिकेची चौकशी केली.

यावेळी या रुग्णाचे नाव धर्मा सोनवणे असे असून त्याला नाशिकहून मुंबईत उपचारासाठी रुग्णवाहिकेतून आणण्यात आले असल्याचे त्याना समजले. मात्र या रुग्णाला दाखल करून घ्यायला नकार दिल्याने त्याला पुन्हा नाशिककडे घेऊन जात असल्याचे त्याच्या नातेवाईकांनी मुख्यमंत्री शिंदे यांना सांगितले. अखेर क्षणाचाही विलंब न करता मुख्यमंत्र्यांनी ठाणे जिल्हा रुग्णालयात फोन करून या रुग्णाला दाखल करून त्यावर तातडीने उपचार करण्याचे निर्देश दिले. तसेच त्याला तात्काळ मदत करण्यासाठी आपल्या ताफ्यातील रुग्णवाहिका देऊ केली. मुख्यमंत्र्यांनी ताफा थांबवून आपली अडचण समजून घेऊन तत्परतेने मदत केलेली पाहुन सोनवणे यांच्या कुटूंबियांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. यानिमित्ताने त्यांच्या संवेदनशील स्वभाव पुन्हा एकदा नव्याने अधोरेखित झाला आहे.


नियमित प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज वर्तमानपत्र...
लवकरच 3 ऱ्या वर्षात पदार्पण करत आहे...
दिवा न्यूज
लवकरच नव्या स्वरुपात...

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, १० जुलै २०२३


# कापूरबावडी आणि माजिवडा जंक्शनवरील अवजड वाहनांचा ताण झाला कमी

## वाहतुकीला अधिक शिस्त लावण्यासाठी आणखी उपाय करण्याचे आयुक्तांचे निर्देश

***ठाणे : भिवंडी-नाशिक बायपास रस्त्यावरून घोडबंदर रोडवर जाणाऱ्या अवजड वाहनांना कॅडबरी जंक्शनच्या पुलाखालून उजवे वळण (यू टर्न) देण्यात आले आहे. या बदलामुळे माजिवडा जंक्शनवरील अवजड वाहनांचा ताण कमी झाला आहे. भिवंडी बायपासावरून ठाण्याकडे येणाऱ्या अवजड आणि लहान वाहनांचे माजिवडा पुलापूर्वी वर्गीकरण करण्यात आले आहे. हाइट बॅरीअर लावल्याने अवजड वाहने पुलावरून कॅडबरी जंक्शन पुलाखाली येतात. तिथे सिग्नल पूर्वी देण्यात आलेल्या उजव्या वळणाचा वापर करून अवजड वाहने घोडबंदर रोडकडे मार्गस्थ होऊ लागली आहेत. त्यामुळे, माजिवडा जंक्शन खाली होणारी अवजड वाहनांची कोंडी दूर झाली आहे.***



कापूरबावडी आणि माजिवडा जंक्शन येथे करण्यात आलेल्या वाहतूक बदलांचा आढावा शुक्रवारी सकाळी ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर आणि पोलीस उपायुक्त (वाहतूक) डॉ. विनयकुमार राठोड यांनी संयुक्त पाहणी दौऱ्यात घेतला.

जेएनपीटी, पुणे, नाशिक येथून ठाणे मार्गे होणारी माल वाहतूक मुंब्रा बायपास आणि घोडबंदर रोडवरून मुंबई किंवा अहमदाबादच्या दिशेला जाण्यासाठी कापूरबावडी जंक्शनमधून जाते. शहरांतर्गत असलेल्या हे दोन्ही जंक्शन्स प्रचंड वर्दळीचे आणि गुंतागुंतीचे झाले होते. यावर पर्याय म्हणून माजिवडा पूलावरून कॅडबरी चौकाआधी या वाहनांना यू टर्न देण्यात आला. त्यामुळे ही अवजड वाहने आता कॅडबरीचा यू टर्न वापरून कापूरबावडीच्या दिशेने पुलावरूनच जाऊ लागली आहेत. त्यासाठी माजिवडा जंक्शनपूर्वी हाईट बॅरिअर लावण्यात आले. त्यावर ब्लिंकर्स, त्याआधी रस्त्यावर दिशादर्शक फलक लावण्यात आले.या माध्यमातून वाहतूक वळवून आता एक महिन्यापेक्षा जास्त काळ झाला आहे. पुलाखालील वाहतूक सुरळीत झाली आहे. या बदलांमुळे माजिवडा आणि कापूरबावडी जंक्शन पुलाखालील वाहतूक पूर्णत: अवजड वाहनमुक्त करण्यात यश मिळाले आहे.

आजच्या पाहणी दौऱ्यात, हाइट बॅरीअर सुरू होण्यापूर्वी रस्त्यावर रंबलर्स लावावेत. तसेच, हाईट बॅरिअरला रिफ्लेक्टर रेडिअम बसवावेत, म्हणजे रात्रीच्या वेळीही दोन्ही प्रकारच्या वाहन चालकांना मार्गिका बदल आणि हाइट बॅरीअर यांची आगावू सूचना मिळेल, असे निर्देश बांगर यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

### चक्राकार वाहतूक

कापूरबावडी आणि माजिवडा जंक्शन वरील वाहतुकीचे परिचलन नीट व्हावे यासाठी महापालिका प्रशासन आणि वाहतूक पोलीस विविध उपाय करीत आहेत. ही दोन्ही जंक्शन्स वर्दळीच्या जंक्शन्सपैकी आहेत. येथे गाड्यांची वाहतूक वेगवेगळ्या विविध दिशांना होते. तर, अनेक मार्गिका एकमेकांना छेदणाऱ्या (क्रिस क्रॉस पद्धतीच्या) आहेत. त्यामुळे वाहनांचा खोळंबा होतो. यामुळे या दोन्ही जंक्शन्सवर चक्राकार पद्धतीने (रोटरी) वाहतूक नियोजन करून एकमेकांना छेदणारी वाहतूक (क्रिस क्रॉस मुव्हमेंट) शक्य तेवढी कमी करण्याचा प्रयत्न महापालिका आणि वाहतूक पोलीस करत आहेत.

या प्रयत्नांचा एक भाग म्हणून माजिवडा आणि कापूरबावडी जंक्शन या ठिकाणी वाहतूक मार्गिका निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी वाहतूक बेट विकसित करून त्याची अमलबजावणी करण्याची सूचना आयुक्त बांगर यांनी दिली. याची अमलबजावणी झाल्यावर, पुलाखाली जंक्शनवर झेब्रा क्रॉसिंग, लेन मार्किंग, ग्रिड मार्किंग करून घेण्यासही त्यांनी सांगितले.

### अधिकृत पार्किंग

**कापूरबावडी नाका, माजिवडा नाका येथील उड्डाणपुलाखाली मोकळ्या जागांवर असमाजिक तत्त्वांचा वावर असतो. गर्दुल्ले असतात. अनधिकृत पार्किंग केले जाते. याला आळा बसण्यासाठी मळक्या, अस्वच्छ जागा साफ करून तेथे नियंत्रित अधिकृत पार्किंग केले जाणार आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. या पाहणी दरम्यान, उथळसर येथील रस्ते दुभाजकांच्या माध्यमातून रस्त्याच्या दोन्ही बाजूंना समांतर पार्किंग होत असल्याचे निर्देशनास आले. तसेच, फुटपाथ आणि रस्त्यावरील अतिक्रमणे, व्यवसायधारक-फेरीवाले यांच्यावरही नियंत्रण आल्याचे दिसले.**

---

# क्लस्टर उपायुक्त रोडे यांना ठामपा अतिरिक्त आयुक्तपदी बढती

## हेरवाडे यांची नवीमुंबईत बदली

**ठाणे:** शासनाकडून नियुक्त ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांची नवी मुंबई येथे नगर परिषद प्रशासन संचालनालय उपायुक्त पदी बदली झाली आहे. तर त्यांच्या जागी ठाणे महापालिकेच्या क्लस्टर विभागाचे उपायुक्त प्रशांत रोडे यांना ठामपा अतिरिक्त आयुक्तपदी बढती मिळाली आहे.



नगरविकास कॅडर उपायुक्त दर्जा असलेले प्रशांत रोडे हे वर्षभरापूर्वी ठाणे महापालिका सेवेत शासन नियुक्तीवर आले होते. त्यापूर्वी ते अमरावती पालिकेच आयुक्त होते. कोव्हीड काळात त्यांनी आयुक्त म्हणून यशस्वी कामगिरी दाखवली. बेकायदा बांधकामांविरोधात त्यांनी उभारलेली मोहिम विशेष गाजली. कराड, बारशी, अकोला या पालिकांमध्येही त्यांनी सेवा बजावली आहे. गेल्या वर्षभरापासून ठाणे महापालिकेत ते क्लस्टर विभागाचे उपायुक्त म्हणून कार्यभार सांभाळत होते. त्यांच्या काळातच क्लस्टरचे भूमिपूजन झाले. त्यांच्याकडे माहिती व जनसंपर्क विभागही होता. त्यांना ठामपा अतिरिक्त आयुक्तपदी बढती मिळाली आहे.

# मेट्रो गर्डर टाकण्यासाठी घोडबंदर रोडवर वाहतुक बंद

**८ ते १७ जुलै २०२३ दरम्यान रात्री ११.५५ ते पहाटे ५ वाजेपर्यंत**

**ठाणे:** घोडबंदर रोडवरील मानपाडा ते आनंदनगर दरम्यान मेट्रो ४ च्या सीपीसी टी व आय गर्डर टाकण्याचे काम आजपासून सुरू झाले असून ते काम येत्या १७ जुलै २०२३ रोजीपर्यंत रात्री बारानंतर पहाटे ५ दरम्यान केले जाणार आहे. यावेळेत ठाणे ते घोडबंदर वाहिनीवरील अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घातली आहे. तसेच त्या मार्गावरील ती वाहने सुचविलेल्या मार्गाने मार्गक्रमण करतील असे वाहतूक विभागाने म्हटले आहे.

वाहतूक शाखेचे उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड यांनी यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. त्यामध्ये मुंबई, ठाणे कडून घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या अवजड वाहनांना कापुरबावडी जंक्शन येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. त्यांना पर्यायी मार्ग कापुरबावडी वाहतुक शाखा जवळून उजवे वळण घेऊन खारेगाव टोलनाका, मानकोली, अंजुर फाटा मार्गे जाता येणार आहे.

मुंब्रा-कळवा कडून घोडंबदरकडे जाणारी वाहने खारेगाव टोलनाका येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. त्यांना खारेगाव खाडी ब्रीज खालून खारेगाव टोलनाक, मानकोली, अंजुरफाटा मार्गे जाता येणार आहे. याशिवाय नाशिक कडून घोडबंदरच्या दिशेने जाणारी अवजड वाहने मानकोली नाका येथे थांबविण्यात येणार आहेत. त्यांना पर्यायी मार्ग मानकोली ब्रीज खालून उजवे वळण घेऊन अंजुर फाटा मार्गे जाता येणार आहे. तसेच मानपाडा येथे यु गर्डर चे काम करतांना मानपाडा ब्रीजखालून घोडबंदरकडे जाणारी वाहने मानपाडा ब्रीज ते टिकुजीनीवाडी सर्कल येथून उजवे वळण घेऊन निळकंठ ग्रीन सोसायटी मार्गे मुल्ला बाग येथून मुख्य रस्त्यास जाणार आहेत. तर आनंद नगर येथे गर्डर टाकतांना डी मार्ट जवळून सेवा रस्त्याने पुढे आनंद नगर सिग्नलजवळ उजवा बाजून वळण घेत मुख्य रस्त्यास जाता येणार आहे.

# दिव्यातील बेडेकर नगर येथे महिला डॉक्टरला समाजकंठकांकडून त्रास

## संबंधितांवर कारवाईची डॉक्टरकडून मागणी

▶ सुदेश सकपाळ

*दिवा:-दवाखाना चालवताना काही समाजकंटक गुंडगिरी करून वैद्यकीय सेवा देण्यात जाणीवपूर्वक अडथळा आणत असल्याचा आरोप बेडेकर नगर येथे वैद्यकीय सेवा देणाऱ्या आस्था क्लिनिकच्या डॉक्टर स्वप्नाली जगताप यांनी केला आहे.याबाबतची तक्रार पोलिसांत केली असल्याची माहिती त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.*




बेडेकर नगर येथे बेडेकर इंग्लिश स्कुल शेजारी आस्था क्लिनिकच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉ. स्वप्नाली जगताप यांना तेथील काही समाजकंटक जाणीवपूर्वक त्रास देत असून मेडिकल व दवाखान्यावर दगड मारण्याचे प्रकार करत असतात.दवाखान्याबाहेर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे काढून टाकण्याची धमकी सुद्धा हे समाजकंटक दवाखान्यात येऊन देत असल्याची माहिती डॉ. जगताप यांनी पत्रकारांना दिली आहे.सुरक्षिततेच्या दृष्टीने लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे देखील फोडून टाकण्यात आल्याचे कॅमेऱ्यात रेकॉर्ड झाले असल्याचे डॉ.जगताप यांनी सांगितले.एका महिला डॉक्टरला अशा पध्दतीने त्रास दिला जात असताना यानिमित्ताने महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.वैद्यकीय सेवा देणाऱ्या महिला डॉक्टरला अशी वागणूक दिली जात असल्याने स्थानिक जनतेतून संताप व्यक्त होत आहे.

> *हा प्रकार गंभीर आहे.माझी पोलिसांना हात जोडून विनंती आहे त्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेऊन महिला डॉक्टरला त्रास देणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी.*
>
> **– सतीश केळशिकर,** *भाजप*

> *मला जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे.क्लिनिकच्या बाहेर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे तोडण्यात आले.या समाजकंटकांनी दवाखान्यात येऊन धमकी दिली.त्यांची नावे पोलिसांना दिली आहेत.पोलिसांनी कारवाई करावी ही माझी विनंती आहे.*
>
> **– डॉ.स्वप्नाली जगताप,** *आस्था क्लिनिक*

# कल्याण लोकसभा मतदारसंघात जलद प्रवासाचा मास्टर प्लॅन



**ठाणे :** कल्याण लोकसभा मतदारसंघाला जोडणारे महामार्ग, राज्यमार्ग आणि महत्वाचे रस्ते यांच्यात संलग्नता येऊन वाहतूक व्यवस्था बळकट करण्यासाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी नुकतीच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) मुख्यालयात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत कल्याण रिंग रोड, काटई ऐरोली उन्नत मार्ग, तळोजा खोणी ते जुना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार रस्ता, शिळफाटा उड्डाणपूल यांसारखे महत्त्वाचे प्रकल्प तसेच उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ या शहरातील वाहतूक व्यवस्था बळकट करणाऱ्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला.

# दिव्यात मान्यता नसलेल्या शाळांवर शिक्षण विभागाची कारवाई

## मात्र त्यानंतर ही मान्यता नसलेल्या शाळा सुरूच!

**दिवा:** दिव्यात शिक्षण विभागाची मान्यता नसलेल्या सुमारे ४३ शाळा असून या शाळांवर ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागाने कारवाईचा बडगा उगारला खरा, मात्र यानंतरही सदर शाळा सुरू असून या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला जबाबदार कोण? असा प्रश्न आता निर्माण होत आहे.

कारवाईनंतर सदर शाळेतील विद्यार्थी अधिकृत शाळांमध्ये वर्ग होणे अपेक्षित असताना नोंदणीकृत/मान्यता प्राप्त नसलेल्या शाळा कारवाईनंतरही सुरू राहत असतील तर याला नेमका कुणाचा आशीर्वाद आहे?असा प्रश्न आता पालक वर्गातून विचारला जात आहे.

### विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला जबाबदार कोण?

शिक्षण विभागाची मान्यता नसलेल्या शाळांची संख्या वाढत आहे. त्यामुळे शिक्षण घेणाऱ्या दिव्यातील गोरगरीब कुटुंबातील मुलांचे भवितव्य धोक्यात आले आहे. दिव्यातील अनधिकृत शाळांवर शिक्षण विभागाकडून कारवाई केल्याचे सांगितले जाते.ठाणे महापालिका क्षेत्रातील दिव्यात तब्बल ४३ शाळा अनधिकृत असल्याचे आढळून आले आहे. सर्वाधिक अनधिकृत-शाळा या इंग्रजी माध्यमाच्या आहेत. अनधिकृत शाळा सुरु असल्यास शाळा प्रशासनाला एक लाख रुपये दंड आणि त्यानंतरही शाळा सुरु राहिल्यास १० हजार रुपये प्रति दिवशी दंड अशा कारवाईची तरतुद आहे. असे असतानाही महापालिकेकडून या शाळांवर ठोस कारवाई होत नसल्याचे दिसून आले आहे.ज्या शाळा अनधिकृत किंवा मान्यताप्राप्त नाहीत त्या कायमच्या बंद का केल्या जात नाहीत असा सवाल आता पालक वर्ग विचारत असून या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असल्याने पालकांमध्ये नाराजी दिसत आहे.

# नेते गेले तरी दिव्यातील सामान्य शिवसैनिक उद्धव ठाकरे आणि मातोश्रीशी एकनिष्ठ!

## येणाऱ्या निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेची ताकद दिसेल



### उपशहर प्रमुख सचिन पाटील यांचा दावा

## दिव्यातील प्रश्न न सुटल्यास महापालिकेच्या विरोधात शिवसैनिक रस्त्यावर उतरणार

### सचिन पाटील यांचा इशारा

**ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा उपशहर प्रमुख सचिन पाटील यांनी नुकताच दिवा न्यूज वर्तमानपत्राशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी दिल्लीतील भाजप सरकारच्या हुकूमशाही प्रवृत्ती विरोधात पक्षप्रमुख उद्धव ठाकरेच सक्षमपणे आवाज उठवत असल्याचे सांगत, दिव्यातील शिवसैनिक हे आजही ठाकरे कुटुंब आणि मातोश्रीशी एकनिष्ठ असल्याचा दावा केला. येणाऱ्या निवडणुकीत दिव्यात ठाकरेंच्या शिवसेनेची ताकद दिसेल असेही त्यांनी या मुलाखतीत म्हटले....**

**प्रश्नः– दिव्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून नव्याने पक्ष बांधणीस तुम्ही सुरुवात केली आहे. लोकांचा प्रतिसाद कसा आहे?**

**सचिन पाटीलः–** कल्याण लोकसभेचे संपर्कप्रमुख सुभाष भोईर यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करत आहोत. दिव्यातील सर्वसामान्य शिवसैनिक आणि जनतेचा प्रतिसाद अतिशय चांगला आहे.दिव्यात सुद्धा ज्यांना शिवसेना पक्षाने सर्व काही दिलं, त्यांनी उद्धव साहेबांना सोडलं.मात्र येथील सामान्य शिवसैनिक आजही मातोश्री आणि ठाकरे यांच्या सोबत आहे...तुम्ही जर दिव्यात आज फिरलात तर दिव्यामध्ये राहणारा आणि मुंबईत कामानिमित्त असणारा मराठी माणूस याची नाळ शिवसेनेसोबत जोडलेली आहे.बाळासाहेब ठाकरे यांचा शेवटचा आदेश शिवसैनिक विसरलेला नाही. निवडणुकीच्या काळात तुम्हाला बदल नक्की दिसेल. ज्यांनी उद्धव साहेब आणि शिवसेनेशी गद्दारी केली त्यांना सामान्य शिवसैनिक धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही हा विश्वास आम्हाला आहे.

**प्रश्नः– दिव्यात पक्ष संघटना बांधण्यासाठी कोणते विशेष कार्यक्रम हाती घेतले आहेत का?काय नियोजन आहे..**

**सचिन पाटीलः–** कल्याण लोकसभेचे संपर्कप्रमुख माजी आमदार सुभाष भोईर यांनी दिवा शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बांधणीसाठी तरुणांवर विश्वास ठेवला आहे.शिवसैनिकांच्या भेटीगाठी सुरू आहेत.नागरिकांना प्रत्यक्ष भेटण्यावर भर आहे.दिव्यात तरुणांचे नेतृत्व यानिमित्ताने पुढे येत आहे.सामाजिक उपक्रम राबविण्यावर आमचा भर आहे.८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण ही आम्हाला आमच्या नेत्यांची शिकवण आहे.आज उद्धव साहेबांना मानणारा मोठा वर्ग महाराष्ट्रात आहे.महाराष्ट्राचे कुटुंब प्रमुख म्हणून त्यांनी केलेलं काम आजही लोकांच्या लक्षात आहे. दिल्लीश्वरांसमोर उद्धव साहेब लढत असल्याने महाराष्ट्रातील तरुण ज्येष्ठ नागरिक महिला या उद्धव साहेबांच्या पाठीशी ठामपणे उभ्या आहेत.दिवा शहरात नव्या नियुक्त्या लवकरच जाहीर होणार आहेत. काही जण निवडणुकीची वाट बघतायेत, योग्य वेळी ते शिवसेनेत प्रवेश करतील. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे ब्रीदवाक्य आम्ही पाळत आहोत. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे.महा रक्तदान शिबीर, शैक्षणिक उपक्रम, महिलांचे प्रश्न,नागरी सुविधा यावर आम्ही काम करत आहोत.

**प्रश्नः– दिव्यात अनेक समस्या आहेत या समस्यांकडे आपण कसे पाहता?**

**सचिन पाटीलः–** गेली अनेक वर्ष ज्यांच्या ताब्यात ठाणे महापालिकेची सत्ता होती त्यांनी दिव्यातील मूलभूत समस्या सोडवण्याकडे दुर्लक्ष केलं.आम्ही अनेक प्रश्न महापालिका प्रशासनाकडे मांडत असतो, मात्र पालिका प्रशासन प्रतिसाद देत नाही. मोगलाई पद्धतीने येथील कारभार सुरू आहे. जाणीवपूर्वक प्रशासन आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचे आमच्या लक्षात आले आहे. लवकरच महापालिका प्रशासनाच्या गलथान कारभाराविरोधात आंदोलन करण्याचा निर्धार आम्ही केलेला आहे. येथील सामान्य शिवसैनिक महापालिकेच्या कारभाराविरोधात रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. आता पावसाळा सुरू झाला आहे आणि या पावसाळ्यात ही नागरिकांना पाणी समस्येला सामोरे जावं लागत आहे. अनेक भागात लोकांना पावसाळ्यात टँकरने पाणीपुरवठा होतो. हे दिव्याचं दुर्दैव आहे. पाईपलाईनचे उद्घाटन होऊनही दिवा शहराला पाणी मिळत नसेल तर कुठेतरी नियोजन चुकलेले आहे हे प्रशासनाने मान्य करायला हवे. दिवा शहरातील लोकांना अनेक सुविधांपासून वंचित रहावे लागते.या समस्या सोडवण्यासाठी आता तरुणांना संधी मिळणं गरजेचं आहे.

**प्रश्नः– दिवा शहरातील नागरिकांना काय आवाहन कराल..**

**सचिन पाटीलः–** दिल्लीच्या भाजप सरकारच्या अन्यायाविरोधात... हुकूमशाही प्रवृत्ती विरोधात, बाळासाहेब ठाकरे यांचे खरे वारसदार उद्धव साहेब ठाकरे हे संघर्ष करत आहेत. या संघर्षाच्या काळात महाराष्ट्राचा लढाऊ बाणा जपण्यासाठी सर्व शिवसैनिकांनी उद्धव ठाकरेंच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. दिवा शहरातील जनतेने देखील या लढ्यात सहभागी व्हायला पाहिजे. उद्धव साहेब ठाकरे हेच महाराष्ट्राचा खऱ्या अर्थाने विकास करू शकतात. हे त्यांनी कोरोना काळात दाखवून दिले आहे. परिणामी येथील जनतेने, दिवा शहरातील मूलभूत समस्या सोडवण्यासाठी व गद्दारांना धडा शिकवण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षासोबत ठामपणे उभे रहावं. शिवसैनिकच सर्वसामान्य जनतेला न्याय देऊ शकतात हा विश्वास आम्हाला आहे.येथील जनतेने अन्याया विरोधात आवाज उठवला पाहिजे,आम्ही जनते सोबत आहोत.